# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३** **दिनांक. ३०.०४.२०२१**

वाचाः- १) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना/२०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०.

४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग,मुंबई यांचे आदेश क्रं.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि. २९.१०.२०२०, दि.०३.११.२०२०, दि.१४.११.२०२०, दि.२७.११.२०२०, दि.२१.१२.२०२०, दि. २९.१२.२०२०, दि.२९.०१.२०२१, दि.२४.०२.२०२१,दि.१५.०३.२०२१, दि.२७.०३.२०२१, दि.०४.०४.२०२१, दि.०५.०४.२०२१,दि.१३.०४.२०२१,दि.२०.०४.२०२१, दि. २१.०४.२०२१ व दि. २९.०४.२०२१.

५) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दि.३१.१०.२०२०, दि.०४.११.२०२०, दि. १५.११.२०२०, दि. २८.११.२०२०,दि. २२.१२.२०२०, दि.३०.१२.२०२०, दि. २९.०१.२०२१, दि. ०१.०३.२०२१, दि.२१.०३.२०२१, दि.३१.०३.२०२१, दि.०५.०४.२०२१,दि.०६.०४.२०२१,दि.०८.०४.२०२१, दि.१०.०४.२०२१, दि. १४.०४.२०२१, दि. १७.०४.२०२१, दि. २०.०४.२०२१ व दि. २२.०४.२०२१.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी (Break the Chain) प्रतिबंधात्मक आदेशाचा कालावधी वाढविणे बाबत.

**आदेश**

ज्याअर्थी, कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून या कार्यालयाचे संदर्भ क्र.५ वरील दि. २२.०४.२०२१ च्या आदेशान्वये नांदेड जिल्ह्यात अत्यावश्यक सेवेतील दुकानांना सकाळी ०७.०० ते सकाळी ११.०० वा.पर्यंत सुरू राहण्यास परवानगी देण्यात आली असून सदर आदेश दिनांक ०१/०५/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा. पर्यंत लागू करण्यात आला होता.

आणि ज्याअर्थी मा.मुख्य मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांचे संदर्भ क्र.४ वरील नमुद आदेश दिनांक २९.०४.२०२१ नुसार राज्यात Break the Chain अंतर्गत सदर ताळेबंदीचा कालावधी दिनांक १५.०५.२०२१ चे सकाळी ०७.०० पर्यंत वाढवून यापुर्वीच्या आदेशान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील असे निर्देशीत केले आहे.

त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ च्या मधील तरतूदीनुसार संदर्भात नमूद अधिसूचना दिनांक १४,मार्च २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहेत त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ नूसार मला प्रदान अधिकारान्वये **मी डॉ.विपीन इटनकर (भा.प्र.से.) जिल्हादंडाधिकारी नांदेड,** फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये या आदेशाव्दारे संदर्भात नमुद या कार्यालयाचे आदेश दिनांक २२.०४.२०२१ मधील अटी व शर्ती जशास तसे लागू करून **संपूर्ण नांदेड जिल्हयात दिनांक १५.०५.२०२१ चे सकाळी ०७.०० पर्यंत ताळेबंदीचा (Break the Chain) कालावधी वाढविण्यात येत आहे.**

संदर आदेशाची अमंलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड, पोलीस अधिक्षक नांदेड, आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालीका नांदेड, मुख्याधिकारी, सर्व नगर परीषद / नगर पंचायत यांचे वर रहील.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह, भारतीय दंड संहिता १८६०, साथरोग प्रतिबंधक कायदा

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com


१८९७, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, मधील तरतुदी नुसार शिक्षेस पात्र राहील. परंतु आदेशाची अंमलबजावणी करताना सदभावनेने केलेल्या कृत्यासाठी कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाही केली जाणार नाही.

हे आदेश आज दि. ३०/०४/२०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात आले आहे.

स्वाक्षरीत/-

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड

**प्रत - माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद .
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
३. पोलीस अधीक्षक, नांदेड.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
५. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, जिल्हा नांदेड.
६. सर्व तहसीलदार जिल्हा नांदेड
७. अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महा.विष्णूपूरी नांदेड
८. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत जिल्हा नांदेड
११. जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड.
१२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नांदेड.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.